महाराष्ट्र शासन
शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई,
दूरध्वनी :- ०२२-२४९३ १८५६ /०२२-२४९३ २९७२ / ०२२-२४९३ ९५५३ / ई.मेल -gts.worli@gmail.com

दिनांक :- ०६/०५/२६

जा.क्र. संगणक ख.वा.दे.दु./२०२६/र.व.का./प्र.क्र.६ /कार्या रवका /

नियंत्रक,शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयात ऑल ईन वन ०६ नग , डेस्क टॉप ९ नग असे एकूण १५ नग संगणक व २ नग प्रिंटर नेटवर्किंगमध्ये व झेरॉक्स मशीन कार्यरत आहेत. संगणक व नेटवर्किंगमध्ये कार्यरत असलेले २७ नेटवर्किंग पॉइंट, ३ राउटर, २४ पोर्टचा १ स्वीच व ३२ आय.ओ.बॉक्स, पँच कॉर्ड/आर.जे ४५ व संलग्न नेटवर्क केबल सुस्थितीत ठेवण्याकरिता शासन निर्णय वित्त विभाग, क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२ दि.१७/०४/२०१५ भाग पहिला उप विभाग दोन मधील अ.क्र.२८,नियम क्र.७६ नुसार स्वत:च्या कार्यालयात किंवा दुय्यम कार्यालयात उपयोगात असलेल्या सर्व यंत्रांच्या संदर्भात ती सुस्थितीत ठेवण्यासंबंधीची / सेवा संविदा दरकरार करण्यासाठी पुर्ण अधिकार आहे. प्राप्त अधिकाराचा वापर करून दिनांक ०१/०९/२०२६ ते ३१/०८/२०२७ या वार्षिक कालावधीकरीता इच्छुक संस्थेकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वार्षिक दुरुस्ती व देखभालीकरिता सेवा संविदा दरकरार करण्याकरिता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

संगणक व नेटवर्किंग याची वार्षिक दुरुस्ती व देखभालीकरिता सेवा संविदा दरकरार जाहिरात नियंत्रक , शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांच्या सूचना फलकावर तसेच महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

| अनु.क्र. | दरपत्रके प्रक्रिया | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रके उपलब्ध होण्याची तारीख व वेळ | दि. १०/०८/२०२६ सकाळी ११.०० वाजता |
| २ | शा.प.सेवा कार्यालयात दरपत्रके जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. १८/०८/२०२६ दुपारी ०३.०० वाजता |
| ३ | शा.प.सेवेत मा.नियंत्रण कक्षात दरपत्रके उघडण्याची तारीख व वेळ | दि. १८/०८/२०२६ दुपारी ०४.०० वाजता |
| ४ | शा.प.सेवा,वरळी येथे संगणक व सलंग्न साहित्य पाहण्याकरिता उपलब्ध | दि. १०/०८/२०२६ ते दि. १८/०८/२०२६ |
| ५ | वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरार कालावधी | दि. ०१/०९/२०२६ ते दि. ३१/०८/२०२७ |

विवरणपत्र नमुना (संस्थेने लेटरहेड वर भरून द्यावे)

| अनु.क्र . | तपशील | मुळ रक्कम रु. | वस्तू व सेवाकर रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | ऑल ईन वन ६ नग व डेस्क टॉप ९ नग एकूण १५ संगणक (नॉन- कॉम्प्रेहेन्सिव्ह) | | | |
| २ | ब्रदर प्रिंटर (नॉन- कॉम्प्रेहेन्सिव्ह) | | | |
| ३ | २७ नेटवर्किंग पॉइंट, ३ राउटर, २४ पोर्टचा १ स्वीच व ३२ आय.ओ.बॉक्स, पँच कॉर्ड / आर.जे ४५ व संलग्न नेटवर्क केबल (नॉन- कॉम्प्रेहेन्सिव्ह) | | | |
| ४ | एकूण वार्षिक दुरुस्ती व देखभाल रक्कम (वस्तू व सेवाकरांसहित) | | | |

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती :-

- दरपत्रक शुल्क रु.५००/- ( ना-परतावा ) रोखीने रोखपाल शाखेकडे जमा करून रीतसर पावती जोडावी.
- संगणक व संलग्न नेटवर्किंग साहित्य "वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरार" च्या न्यूनतम प्राप्त दरपत्रकाच्या ( वस्तू व सेवाकरासहित ) एकूण रकमेच्या ३% इतकी अनामत रक्कम बँक गॅरंटी स्वरुपात यशस्वी निविदा धारकाने रोखपाल शाखेकडे जमा करावी तसेच अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय नाही.
- पुरवठादार संस्था ही मुंबई महानगर क्षेत्र ( Mumbai Metropolitan Region ) मधीलच असावी. जेणेकरून सत्वर सेवा उपलब्ध होऊ शकेल.
- शा.प.सेवा कार्यालयात कार्यालयीन वेळेतच संगणक व संलग्न नेटवर्किंग साहित्य पाहता येईल.
- विवरण पत्रामधील नमूद अनु क्र.१, २ व ३ करिता एकूण वार्षिक रक्कम रकान्यात भरावी तसेच अधिक वस्तू व सेवा कर रक्कम भरावी.
- विवरण पत्रामधील अनु क्र.४ मधील वस्तू व सेवाकरासहित नमूद एकूण न्यूनतम रकमेला अंतिम मान्यता देण्यात येईल. तसेच या संस्थेला यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल.
- संगणक व संलग्न नेटवर्किंग साहित्य पाहूनच मूळ रक्कम अधिक वस्तू व सेवा कर नमूद करूनच न्यूनतम मोहोरबंद दरपत्रके विहित कार्यालयीन वेळेतच कार्यालयात जमा करावी. उशिरा प्राप्त झालेले दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.
- संगणक व सलंग्न साहित्यांचा नादुरुस्त होणारा सुटा भाग बदलने किंवा त्या अनुषंगिक मोठ्या व खर्चिक असलेल्या कामाची कार्यालयीन परवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच सदर सुटा भाग बाजारभावापेक्षा न्यूनतम दरानेच पुरविण्यात यावा.
- दूरध्वनीद्वारे तक्रार नोंदविल्यास २४ तासात तात्काळ आपले संगणक व नेटवर्किंग तज्ञ हजर होऊन तक्रार निवारण करून संगणक व संलग्न यंत्रणा कार्यान्वित करून देणे बंधनकारक राहील.
- आपल्या सेवेत त्रुटी / दिरंगाई आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदर वार्षिक सेवा संविदा दरकरार तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येवून ३% अनामत बँक गॅरंटी रक्कम यशस्वी निविदाधारकास अदा करण्यात येणार नाही.
- पुरवठादार संस्थेने दिलेल्या बँक तपशील / अदाता प्रमाणपत्रा नुसार संगणक प्रणालीद्वारेच त्रैमासिक पद्धतीने देयकाची रक्कम पुरवठादार संस्थेच्या खात्यात ऑनलाईन प्रणालीद्वारेच जमा करण्यात येईल.
- संस्थेचे वस्तू व सेवाकर प्रमाणपत्र, पॅन क्रमांक , उद्योग आधार प्रमाणपत्र तसेच कामाचा अनुभव प्रतिलिपी सोबत जोडाव्यात.
- वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरारनामा रु ५०० /- च्या गैर न्यायिक पेपरवर लिहून द्यावा तसेच त्यामधील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे.
- वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरारा संदर्भात काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याचे कार्यक्षेत्र मुंबई राहील.
- संगणक व सलंग्न साहित्यांची वार्षिक दुरुस्ती व देखभालीकरिता सेवा संविदा दरपत्रकाद्वारे निविदेमध्ये कोणताही बदल अथवा सदर निविदा कोणत्याही टप्प्यावर स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

(राजेंद्र भवारी)
नियंत्रक,
शासकीय परिवहन सेवा, मुंबई

Scanned with OKEN Scanner